Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):02
ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU
International open-access peer-reviewed refereed monthly journal
https://knowledgeableresearch.com/index.php/1

# लेखकाचे अस्तित्व आणि साहित्यिक मूल्ये

डॉ.कविता चंद्रकात लोहाळे*

ग्रामीण (कला वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर, मुखेड ता. मुखेड जि.नांदेड

**शोध सार**

*साहित्य ही मौलिक बाब आहे. मानवी जीवनाच्या वाटचालीत तत्त्वज्ञान महत्वाचे पण तत्त्वज्ञानाबरोबरच साहित्यानेही समाज जीवनात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. साहित्याचे आकलन मानवी संस्कृतीला आकार आणि आशय देते. साहित्य हा जीवनातला मौलिक प्रकाशग्रह असून त्यामुळे अतिशय प्रभावी प्रेरणा जागृत होतात. साहित्याद्वारे होणारे परिणाम दूरगामी असतात आणि ते फार महत्त्वाचे असतात.साहित्य ही एक कला आहे. इथे भावविश्व आणि विचारायलाही महत्त्वाचे स्थान आहे. विचारामुळे साहित्यकृतीला घनता व वजन प्राप्त होते तर भावविश्वाव्दारे साहित्यकृती मनावर अधिराज्य गाजवते. विचार व भावना अंतर्मनातून फुलून आलेल्या असतात त्यामुळे त्या एका मार्गदर्शकाप्रमाणे कार्य करतात.*

**बीज शब्द:** *लेखकाचे अस्तित्व, साहित्यिक मूल्ये, तत्त्वज्ञान, समाज, मानवी संस्कृती, प्रेरणा, कला, भावविश्व, विचार, मार्गदर्शक*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
डॉ.कविता चंद्रकात लोहाळे
**Email:** kavitalohale76@gmail.com

## स्वरूप

निर्मिती करता येणे हे मानवाचे वैशिष्ट्यच आहे आणि नवनिर्मिती करता येणे हा माणसाच्या अनन्यसाधारणत्वाचा पुरावा आहे. साहित्यनिर्मिती ही आपातत: होत नाही. तिच्या मागे एक उत्कट प्रक्रिया उभी असते. काही निर्मितीहेतू असतात. स्वतःच्या आत डोकावण्याचा क्षण, आलेल्या अनुभवाचा अर्थ लावण्याचा व हा अर्थ लावताना आणि लागताना या सर्व प्रक्रियेत रंगून जाण्याचा आणि या रंगून जाण्याच्या वेगात अनुभवाच्या नव्या संगती चमकून जाण्याचा अनावर क्षण हा निर्मिती प्रक्रियेचा प्रारंभ क्षण असतो. साहित्यकृती ही प्रतिभारूप म्हणजे कलावंताला आलेली जीवनाची जाण मांडणारी असते.

साहित्यिकाची विवक्षित जीवनदृष्टी असते. ही दृष्टी त्याचे जगणे, त्याचे अनुभव आणि सांस्कृतिक पर्यावरण यांच्या परस्पर संबंधातून तयार झालेली असते. साहित्यिक ज्या समाजाचा एक अविभाज्य घटक असतो. त्या समाजाच्या मानसविश्वाच्या जडणघडणीतून साहित्यिकाची जीवनमूल्ये तयार होत असतात आणि ती जीवनमूल्ये साहित्यातून आविष्कृत होतात.त्या मूल्यांच्या आधारे साहित्यिकांच्या मनाची मूस तयार झालेली असते. गतकाळाच्या मूल्यदृष्टीच्या प्रकाशात समीक्षा करण्याची आणि भविष्याचा वेध घेण्याची ताकद प्रतिभावंत साहित्यिकात असते. एकूणच काय तर ललित साहित्याच्या विचारात कलावंतांच्या जीवनदृष्टीचाही विचार महत्त्वाचा असतो. साहित्यिकाची प्रतिभा आणि त्याची जीवनदृष्टी यांच्यात सेंद्रिय नाते असते. केवळ प्रतिभाशक्तीच निर्मिती करीत नाही तर त्या निर्मितीसाठी साहित्यिकांची जीवनमूल्येही महत्वपूर्ण ठरतात. साहित्यिक हा माणूस असतो. साहित्यकृतीही त्याच्या व्यक्तिमनाची निर्मिती असते. साहित्यकृती ही एक आशयसंघटना असते. या संघटनेवर लेखकाच्या व्यक्तीत्वाच्या अनंत मुद्रा उमटलेल्या असतात. जीवन आपल्याला घटनांचा तपशील देते, त्याची सुसंगत सुंदर गुंफण कलावंत करतो. लेखकाची जीवनदृष्टी आणि सौंदर्यदृष्टी या मूल्य धारणा साहित्य निर्मिती प्रक्रियेत अगदी हातात हात घालून काम करीत असतात. अनुभव घेण्याच्या त्यातला जीवनार्थ लक्षात घेण्याच्या, अनुभवाच्या नानाविध घटकांची सुसंघटना करण्याच्या आणि या सुंदर प्रत्येयकारी सुसंबंध सौंदर्यबंधाला जीवनार्थत्व देण्याच्या या सर्वच पातळयांवर कलावंताच्या व्यक्तीमत्वाच्या मुद्रा

उमटलेल्या असतात. निर्मिती ही अपरिहार्य असते. तेव्हा एका विवक्षित मनःस्थितीत तो निर्मिती करतो. या निर्मितीमध्ये तो जीवनातील मनुष्य स्वभावाची प्रभावी चित्रे काढतो. नाना वृत्तीप्रवृत्तींची सृष्टी निर्माण करतो. अर्थात त्याचे व्यक्तिमत्व एका नैतिक युद्धात उभे असते. जीवनातील मानवहित विरोधी गोष्टींशी आपले नाते जुळणार नाही याची त्याला डोळ्यातील तेल घालून काळजी घ्यावी लागते. आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक अशा सर्वच संदर्भातील मानवी संबंधाची छाननी- तपासणी तो करतो. हे संबंध मानवी उन्नयनाला कधी मारक असतात तर कधी तारक असतात. जीवनातील प्रगतीपोषक आणि प्रगतीमारक, संवाद- विसंवाद ही व्दंव्दे व्यक्तींच्या कृती उक्ती मधून साकार होतात. त्यामुळे जीवनातील हे दृश्यादृश्य संघर्ष तो या पसाऱ्यातच पाहतो. एका घटनेचा इतर घटनांच्या संदर्भातील अर्थ, एका आचरणाचा दुसऱ्या आचरणाच्या संदर्भात संभवणारा अर्थ तो न्याहाळतो आणि एकूण त्याला आकळणाऱ्या जीवनमर्माच्या संदर्भात संभवणारा अर्थ तो न्याहाळतो. त्यातून तो जीवनाच्या मर्मार्थ प्रकट करण्यासाठी साहित्य निर्मिती करतो.

जसे केशवसुतांची आधुनिक दृष्टी त्यांच्या काव्यातून व्यक्त होते तशी भा.रा. तांबे यांची पारंपारिक अध्यात्मवादी आणि आनंदवादी दृष्टी त्यांच्या काव्यातून व्यक्त होते. 'हासडल्या तुझं शिव्या तरीही तुझ्याच आलो पायी लोळत' अशी ईश्वरशरण जीवन दृष्टी मर्ढेकरांच्या कवितेतून व्यक्त होते तर

'ते रुद्राक्ष, पोथ्या, ते खुंटीवर टांगलेले देव

कालच म्हणालीस 'कुणीही भले केलेले नाही' हे जीवनदृष्टी कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होते. जीवनदृष्टी साहित्यिकाच्या शब्दाला कणा देते.

**साहित्यिक मूल्ये -**

साहित्यिक मुलांच्या संदर्भात विचार करताना प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी म्हटले आहे' जे जे म्हणून एखाद्या मानवी आकांक्षाची तृप्ती करीत असेल त्याला मूल्य म्हणावे', अशी मूल्यांची व्याख्या करून जीवनमूल्ये आणि वाड्मयीन मुल्ये यांचे स्वरूप पुढील प्रमाणे विशद केले.१) ज्या ज्या समाधानांची अथवा सार्थकांची पुरुषाला (मानवाला) गरज असते, त्यांना त्यांना पुरुषार्थ अथवा जीवनमूल्य असे म्हणावयास हरकत नाही.

२) 'ललित वाङ्मयाच्या क्षेत्रातील अपेक्षापूर्तीच्या हेतूंना अगर साधनांनाच आपण वाड्मयीन मूल्ये हे नाव देतो. ज्या ज्या गुणांनी अगर घटकांनी वाड्मयीन आनंद लाभतो, त्यांना त्यांना वाड्मयीन मूल्ये म्हणावयास हरकत नाही.

प्रा. रा.ग. जाधव यांनी वाड्मयीन मूल्यांची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली. त्यांनी म्हटले, 'ललित वाड्मयाची चिकित्सा करून त्याच्या श्रेष्ठ-कनिष्ठपणाविषयी निर्णय देण्यास जा कल्पनांची मदत घेतली जाते, त्या कल्पनांना वाड्मयीन मुल्ये म्हणावयास हरकत नाही.'

प्रमाणबद्धता, औचित्य, सूचकता, संयम, नाविन्य, वैविध्य, एकरूपता, प्रसाद, लय, पोत, मानुषता, लव इत्यादींना सौंदर्य मूल्ये मानले जाते. गुणांनी वा घटकांनी शब्दाकृती सुंदर ठरते; तिच्यात कलाप्रकर्ष होतो, त्या गुणांना वाडमयीन मूल्ये म्हटले जाते.

सत्य, सौंदर्य आणि इष्ट याच्यासह समता, बंधुता, स्वातंत्र्य सामाजिक न्याय हा आशय साकार करणाऱ्या जडवादी मुल्यांना जीवनमूल्ये म्हटले जाते. यातून परिवर्तनवादी जीवन प्रणाली साकार होते. जीवनवादी सौंदर्यशास्त्र साकार होते. जीवनमूल्ये आणि वाड्मयीन मूल्ये यांच्या संदर्भातले अत्यंत मौलिक सत्य सार्त्र सांगतो. कलेने नीतीचा वा स्वातंत्र्याचा प्रत्यक्षपणे पुरस्कार करावा असा त्याचा अर्थ नाही. कलेने फक्त जीवनाचे मर्म सांगावे. स्वातंत्र्याचा वा नीतीचा वेगळा पुरस्कार करण्याची तिला गरजच नाही. याचा अर्थ असा की साहित्य होण्यासाठी कलाकृती होण्यासाठी वा सौंदर्यवस्तू होण्यासाठी शब्दाकृतींना स्वतःच माणसावर अन्याय करणाऱ्या, मानवी प्रतिष्ठा धुळीस मिळविणाऱ्या, कोणाच्याही गुलामीचा पुरस्कार करणाऱ्या अनिष्ट मूल्यांना मोडीत काढले पाहिजे. या अनिष्ट मूल्यांवर अधिष्ठित अनिष्ट वाड्मयीन मूल्यांनाही शब्दाकृतीने टाळले पाहिजे. तिने असे करणे म्हणजे सौंदर्य कृती होण्याची अवश्योपाधी म्हणून तिने जीवन विरोधी व कलाविरोधी मुल्यांना मुठमाती देणे होय. या संदर्भाने टी. एस.इलियट यांचे विचार जाणून घेणे महत्त्वपूर्ण ठरते. ते म्हणतात,' वाड्मयीन महत्ता ही केवळ मूल्यांनी निश्चित करता येत नाही. त्यासाठी महान जीवनमूल्यांची आवश्यकता असते. मराठीत रा.भा. पाटणकर आणि म.द. हातकणंगलेकर हेही अशाच प्रकारची भूमिका घेतात.

या लेखामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता या संदर्भाने लेखकाचे अस्तित्व आणि साहित्यिक मूल्ये विचार करण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने लेखकाचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते काय?तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार झालेले साहित्य यात साहित्यिक मूल्ये आढळतील काय या दोन

प्रश्नाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे विचार करता येईल. सुरुवातीस आपण साहित्यातील वाङ्मयीन मूल्ये व जीवनमूल्ये तसेच साहित्यिक म्हणून घडताना साहित्यिकांवर होणाऱ्या विचारसरणीचा प्रभाव व त्यातून होणारी साहित्य निर्मिती या बाबत विचार केला. लेखकाच्या सर्जनशीलतेतून निर्माण झालेल्या साहित्यावर त्या त्या काळातील सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक परिस्थितीचा प्रभाव असतो. साहित्यिक मुल्येही त्या काळातील मूल्यांची निगडित असतात. यासाठी याचे उत्तम उदाहरण म्हणून पहावयाचे झाल्यास आपणास स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्य, स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्य, साठोत्तरी साहित्य याचे अवलोकन करावे लागेल. या अवलोकनातून असे लक्षात येते की,या प्रत्येक काळातील साहित्याचा वेगळेपणा जाणवतो. कारण त्या त्या काळातील साहित्यिकांवरील झालेल्या पर्यावरणीय संस्काराचा तो परिणाम असतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्यावर राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक सुधारणा, सांस्कृतिक जागृती या विचारांचा पगडा जाणवतो तर स्वातंत्र्योत्तर काळात वास्तववाद, सामाजिक संघर्ष यासोबतच संविधानिक मूल्ये यांचा प्रभाव जाणवतो. साठोत्तरी साहित्यात लोकशाहीवादी व वास्तववादी विचार प्रकर्षाने जाणवतो.माणूस हा केंद्रस्थानी मानून त्याच्या सुखदुःखाचा, त्याचे जीवन समृद्ध करण्याचा विचार त्यात दिसतो. एकूणच काय तर लेखक हा समाजशील प्राणी असल्याकारणाने त्या काळाचे पर्यावरणीय संदर्भ त्याच्या साहित्यावर उमटत असतात. लेखकाचे व्यक्तिमत्व घडविण्यात सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरणाचा मोठा वाटा असतो. अशा संस्करणाच्या बाबतीत कृत्रिम बुद्धिमत्ता यशस्वी ठरणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता निर्मित कोणतीही साहित्यकृती ही मनाचा ठाव घेऊ शकणार नाही तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारित साहित्यकृतीत साहित्यिक मूल्ये उतरणार नाहीत. या साहित्यात कलात्मक व सौंदर्यशास्त्रीय गुणवत्ता दिसणार नाही. त्यात मानवी मूल्यांचे दर्शन घडणार नाही. कारण मूल्यांचे दर्शन घडविण्यासाठी त्याला त्या प्रकारच्या अनुभवातून जावे लागते ते अनुभव कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधाराने घेता येणार नाहीत. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी अशा साहित्यातून येणारे जीवनानूभव कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने साहित्यकृतीत उतरणे अशक्य आहेत. पर्यायाने कृत्रिम बुद्धिमत्ता ही लेखकाचे अस्तित्व व साहित्यिक मूल्ये याला पर्याय ठरू शकणार नाही. थोडक्यात साहित्यकृतींचा समाज मनावर खोल ठसा उमटत असतो. पिढ्यानपिढ्या त्या साहित्यकृती मनाचा ठाव घेत असतात. अशी अभिजात साहित्यकृती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने निर्माण होणे शक्य नाही. पर्यायाने मानवी सर्जनशीलतेची अपरिहार्यता कालातीत असून कृत्रिम बुद्धिमत्ता हा पर्याय ठरू शकणार नाही.

**संदर्भ**

१)श्री.के.क्षीरसागर: टीकाविवेक,पुणे,१९८०

२)या.ग.जाधव: वाङ्मयीन निबंधलेखन,पुणे,१९७७

३)या.भा.पाटणकर: सौंदर्यमीमांसा, मुंबई,१९७४

४)वि.ना.ढवळे: साहित्याचे तत्वज्ञान,पुणे,१९९७

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)